**प्रेस नोट**

**रात्रौ घरफोडी चोरी करणारे सराईत आरोपीत यांना तुर्भे पोलीसांनी ७२ तासाच्या आत केले गजाआड त्यांच्या कडुन १०० टक्के माल हस्तगत**

**थोडक्यात हकिकत :-**

फिर्यादी नामे. श्री. किर्तीक दिलीप मेहता, वय ३१ वर्षे, राह. पलावा डोबीवली, ठाणे हे त्यांच्या मालकीची सरल डिझाईन प्रा.ली. महापे एम.आय.डी.सी नवी मुंबई या कंपनीचे शटर बंद करून गेले असता दिनांक २९/११/२०२१ रोजी रात्रौ २०:०० वा. ते दिनांक ३०/११/२०२१ रोजी सकाळी ०८:०० वा. चे सुमारास शटर उचकटुन त्यामधील १४,६३,७११/- रूपये किमंतीचे मशीन पार्ट, लॅपटॉप , मॉनिटर चोरी करून नेले म्हणुन तुर्भे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३९०/२०२१ भा.द.वि कलम ४५४, ४५७, ३८०, या प्रमाणे दि. ३०/१/२०२१ रोजी ०७:४२ वा. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

**गुन्हयाची उकल :-**

नमुद वरील दाखल गुन्हयाचा तपास हा मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तुर्भे पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि/पवन नांद्रे व अंमलदार हे करीत असुन त्यांनी तांत्रीक पध्दतीने तसेच गुप्त बातमीदारांकडुन माहिती प्राप्त करून कौशल्यरीत्या घटनास्थळी व आजुबाजुच्या परीसरात तपास करून घरफोडी चोरी करणारे आरोपीत यांचा शोध घेवुन सदर गुन्हयात आरोपी नामे **१) सलमान युसुफ शेख वय २८ वर्षे, राह. धानसरगाव, तळोजा, नवी मुंबई २) महेद्र अविनाश पाटील उर्फ मोटया वय २६ वर्षे, राह. महापे हनुमान नगर, नवी मुंबई ३) चंदन कुमार विजयकुमार सिंग, वय २१ वर्षे, राह.महापेगाव, नवी मुंबई** यांना तळोजा/महापे परीसरात दिवस-रात्रौ पाळत ठेवुन **सापळा रचुन गुन्हा दाखल झाले पासुन ७२ तासाच्या आत आरोपीत यांना ताब्यात** घेवुन सदर गुन्हयात अटक केली आहे. सदर आरोपीत यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून चोरीचा माल विकत घेणारा आरोपीत नामे **४) निसार अहमद अब्दुल रौफ खान, वय ३० वर्षे, राह. हनुमान नगर महापे, नवी मुंबई** यास सदर गुन्हयात भादंवि सं. कलम ४११ हे कलम वाढ करून अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणुन खालीलप्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**हस्तगत मुद्देमाल :-**

**(अटक आरोपीत सलमान युसुफ शेख याचेकडुन ०६ लॅपटॉप / ०१ मॉनिटर जप्त केले आहेत.)**

१) ५००० /-रूपये किमंतीचा एक काळया रंगाचा असेर कंपनीचा लॅपटॉप मॉडेल नं. **N17Q2**,
त्याचे **Device no. NXGNTSIOO3732096367600** जु.वा.किं.सु.

२) २६,०००/-रूपये किमंतीचा डेल कंपनीचे २ लॅपटॉप एक काळया रंगाचा व एक सिल्व्हर रंगाचा
त्यांचे **Device no. 32546/SDPPI/2013 3226, 25TZ702** जु.वा.किं.सु.

३) १३,०००/- रू किं.चे एचपी कंपनीचे २ लॅपटॉप एक काळया रंगाचा व एक काळा व लाल रंगाचा
त्याचे **Device no – RTL8188EE, CND2392JS1** जु.वा.किं.सु.

४) ४०००/-रू किं. चा लेनोओ कंपनीचा एक लाल काळया रंगाचा लॅपटॉप जु.वा.
त्याचे **Device no- WB0209110K** जु.वा.किं.सु.

५) १००० /- रू किमंतीचा एक काळया रंगाचा झेब्रॉनिक्स/झेबस्टर कंपनीचा मॉनिटर जु.वा.किं.सु.

------------------

**४९,०००/-रू. एकूण किंमतीचे ०६ लॅपटॉप / ०१ मॉनिटर**

**( अटक आरोपीत नामे महेंद्र अविनाश पाटील उर्फ मोटया याच्या कडुन जप्त मुद्देमाल )**

१) ३,७८,०६१ /-रू किमंतीचे हाय ग्रेड स्टिल डाय एकुण ११७ नग
२) १,१८,८५९/-रू किं.चे हाय ग्रेड स्टिल कटींग डिवाईज एकुण ४४ नग
३) ३,३५,०२२/-रू किं.चे माईल्ड स्टिल मशिन पार्ट एकुण १०८ नग
४) १,७१,७६३/-रू किं.चे माईल्ड स्टिल मशिन पार्ट एकुण ७८ नग
५) १,९०,३८५/-रू किं. चे फॉसफार ब्रॉझ मशिन पार्ट एकुण ६ नग
६) ६१,७९८ /- रू किमंतीचे हाय ग्रेड स्टिल रोलर एकुण ४१ नग
७) ६१,९५० /-रू किमंतीचे एच.पी. मोटार एकुण ०२ नग
८) ७,०००/- रू कंमतीचे इंडक्शन हिटर १ नग
-------------------
१३,२४,८३८/-रू. एकूण किंमत

तसेच गुन्हा करण्याकरीता आरोपीत यांनी वापरलेले वाहन १,५०,०००/- रू किंमतीचा टाटा टेम्पो नंबर MH 43 AD 3305 जप्त करण्यात आला आहे. **वरील प्रमाणे एकुण १५,२३,८३८/- रू. किंमतीचा मुद्देमाल हा अटक आरोपीत यांचेकडुन हस्तगत करण्यात आला आहे.**

अटक आरोपीत नामे १) **महेद्र अविनाश पाटील उर्फ मोटया वय २६ वर्षे,** धंदा बेकार, राह. महापे हनुमान नगर, रिलायन्स गेट नंबर ३ समोर, रुम नं. ३१३, महापे, नवी मुंबई **यांवे विरुद्ध तुर्भे, कोपरखैरणे, रबाळे, नेरुळ, तसेच ठाणे, रायगड , सोलापुर, येथे एकुण ४८ गुन्हे दाखल आहेत.**

अटक आरोपीत नामे २) **सलमान युसुफ शेख वय २८ वर्षे,** राह. रुम नं. १७७, तेलीपाडा, धानसरगाव, तळोजा, नवी मुंबई **यांवे विरुद्ध तुर्भे, तळोजा, पनवेल, उरण तसेच ठाणे, रायगड, येथे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत.**

सदर गुन्हयातील अटक आरोपीत हे दिनांक ०६/१२/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडीत असुन सदर गुन्हयाचा अधिक तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/पवन नांद्रे हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त सो. श्री. बिपीन कुमार सिंग, मा. पोलीस सह आयुक्त सो., डॉ. जय जाधव, मा. पोलिस उप आयुक्त सो., परिमंडळ - १ श्री. विवेक पानसरे, मा. सहा पोलिस आयुक्त सो., तुर्भे विभाग श्री. गजानन राठोड यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि राजेंद्र आव्हाड, पोनि(गुन्हे) सुनिल कदम, सपोनि/पवन नांद्रे, व पथकातील सपोउपनि/छत्रगुन मावळे, पोना/२७६८ अझहर मिर्झा, पोना/२९२८ गणेश चौधरी, पोना/२६८१ गोपीचंद बेंडकुळे, पोशि/३०७६ सचिन पाटील, पोशि/१२०४९ प्रशांत जामदार व पोशि/१२४१५ विकास शिंगाडे यांनी केली आहे.**